जा.क्र. मृदस/विससिंविका/ ३२२/२०१२
मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे ४११००१. **दिनांक २८ जुन, २०१२**

प्रती,

१. **विभागीय कृषि सह संचालक**
अमरावती, नागपुर.

२. **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,**
बुलढाणा, अकोला, अमरावती, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नागपुर, चंद्रपुर

**विषय :- विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमाची (VIIDP) अंमलबजावणी करणेबाबत..**

**संदर्भ :-** केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना D.O.No.13-1/2011/M&T(I&P)/Pt.1
दिनांक २०/४/२०१२

उपरोक्त विषयानुसार केंद्र शासनाने विदर्भातील ८ जिल्हयांत विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रम राबविण्यासाठी संदर्भिय अ.शा.पत्रानुसार कार्यान्वयिन मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेले आहेत. सदरच्या कार्यक्रमातील कृषि विभागामार्फत राबविणेत येणा-या घटकासाठी सन २०१२-१३ करिता रक्कम रु.१२५.०० कोटी निधी केंद्र शासनास मागणी केलेली आहे.

या कार्यक्रमांतर्गत कृषि विभागामार्फत राबविणेचे घटक, त्यांच्या मार्गदर्शक सूचना व जिल्हानिहाय सन २०१२-१३ मध्ये राबविणेचा भौतिक व आर्थिक कार्यक्रम सोबत सहपत्रित करण्यात येत आहे. सदरचा कार्यक्रम मार्गदर्शक सूचनाप्रमाणे प्रकल्प आधारीत राबविणेचा आहे. प्रकल्प राबविणेसाठी क्लस्टर निश्चिती प्राधान्य क्रमानुसार करण्यात यावी. प्रत्येक क्लस्टरचा आराखडा पुर्ण झाल्यानंतर तालुक्याचा व जिल्ह्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात यावा. सविस्तर प्रकल्प अहवाल आंग्ल भाषेत तयार करुन विभागीय कृषि सह संचालक यांचे स्तरावर छाननी करुन आयुतालयास मान्यतेस्तव सादर करावा.

सदर मार्गदर्शक सूचनांबाबत काही शंका असतील तर त्या तातडीने कृषि आयुक्तालयास कळविण्यात याव्यात.

सोबत - वरीलप्रमाणे.

स्वाक्षरीत/-
**आयुक्त कृषि**
**महाराष्ट्र राज्य,पुणे १.**

**प्रत माहितीस्तव सादर**

**१) मा.प्रधान सचिव(कृषि व पणन),** कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२

**२) मा.प्रधान सचिव (जलसंधारण),** ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई -३२

http://mahaagri.gov.in

## विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रम – २०१२ मार्गदर्शक सूचना

**प्रस्तावना -**

राज्याच्या एकुण क्षेत्रापैकी १७.८० टक्के क्षेत्र सिंचनाखाली असुन सर्व सिंचन क्षमता विकसित केल्यानंतरही राज्याचे ७० टक्के क्षेत्र हे कोरडवाहुच रहाणार असल्याचे अनेक आयोगांच्या अहवालांवरुन दिसून येते. राज्यातील विदर्भ विभागाचा विचार केल्यास हा विभाग औद्योगिक व कृषि उत्पादनाच्या बाबतीत मागास राहिला आहे. विदर्भ विभागातील जवळजवळ ६५ टक्के लोकांचा चरितार्थ कृषि व कृषि पुरक व्यावसायावर अवलंबुन आहे. तसेच विदर्भ विभागातील अनेक पिकांची उत्पादकता ही राज्य व देशाच्या उत्पादकतेपेक्षा कमी आहे.

विदर्भातील कापूस व इतर पिकाच्या शेती संदर्भात विविध स्तरावरील समित्यांचे अहवाल, संशोधनातील निष्कर्ष, कृषि तज्ञांच्या क्षेत्रीय भेटीचा अहवाल यासारख्या विविध अभ्यासातून विदर्भ विभागातील सिंचन, नैसर्गिक साधन संपत्ती, आर्थिक सुविधांचा अभावाबाबत उहापोह केलेला आहे. तथापि सिंचन सुविधांचा अभाव, पूर्णतः पर्जन्यावर आधारीत शेती हे दोन घटक कापूस व इतर पिकांच्या शेतीसाठी जास्त धोकादायक व बेभरवसाचे आहेत. वरील मुद्दे विचारात घेवून विदर्भातील कापूस व इतर पीकासाठी संरक्षित सिंचनाची सोय निर्माण करणे तसेच उपलब्ध पाण्याचा कार्यक्षतेने उपयोग करणे तसेच सिंचनाच्या सोयी सुविधा निर्माण करणे यासाठी कालबध्द कार्यक्रम हाती घेवून विदर्भातील कोरडवाहू शेती फायद्यात आणण्यासाठी केंद्र शासनाने **विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रम-२०१२** (Vidarbha Intensive Irrigation Development Programme- 2012) राबविणेचे निश्चित केले असुन त्याबाबतच्या मार्गदर्शक सुचना D.O.No.13-1/2011/M&T(I&P)/Pt.1 Dt.20/4/2012 अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने कृषि विभागामार्फत राबवायच्या विविध घटकासाठीच्या मार्गदर्शक सुचना पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

**कार्यक्रमाचे उद्देश :**

विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रम (VIIDP) खालील उद्देशाने राबविण्यात येईल.

१. विदर्भ विभागातील कोरडवाहू कापूस शेतीची उत्पादकता पावसाच्या पाण्याचे जलसंचय, प्रभावी सिंचन उपाय योजना व उत्तम पीक व्यवस्थापनाच्या माध्यमातून वाढविणे.
२. कापूस पीका खालील जास्तीत जास्त क्षेत्र संरक्षित सिंचनाखाली आणणे तसेच मूलस्थानी मृद व जल संधारणाच्या उपायाव्दारे जमिनीतील ओलावा वाढविणे.
३. आस्तित्वात असलेल्या लघु सिंचन साधनांचे नूतनीकरण/बळकटीकरण करणे. तसेच पाण्याचा उपसा करणेसाठी संयंत्राचा पुरवठा करणे.
४. पाणी वापर क्षमता वाढविणेसाठी ठिबक व तुषार सिंचनाचा वापर करणे.

**कार्यक्रमाचे घटक व मापदंड -**

विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रम हा आस्तित्वात असलेल्या संसाधनात वाढ करणे व कमी खर्चात जास्त क्षेत्र संरक्षित सिंचनाखाली आणणे या उद्देशाने हाती घेण्यात आलेला आहे. सदरचा कार्यक्रम प्रामुख्याने कोरडवाहू क्षेत्रात (खात्रीलायक बागायत क्षेत्राबाहेरील व कोणत्याही कॅनॉल किंवा मोठे सिंचन प्रकल्पा खालील बागायत क्षेत्र सोडून) व पीकाची उत्पादन क्षमता वाढविण्यास वाव आहे अशा क्षेत्रात राबविण्यात येईल.

http://mahaagri.gov.in

**कार्यक्रमामधील समाविष्ट बाब व त्याचे मापदंड -**

**अ. कृषि विभाग**

| अ.क्र. | बाब | परिमाण | अर्थसहाय्याचे प्रमाण | लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| १ | मूलस्थानी मृद व जल संधारणाचा अवलंब करणे अंतर्गत रुंद वरंबा व सरी आणि मृत सरी उघडणे याकरिता प्रोत्साहन | हेक्टर | रु.१०००/- प्रति हे पर्यंत | वैयक्तिक शेतकरी/ शेतकरी गट/ शेतकरी सहकारी संस्था यांना बीबीएफ प्लान्टर किंवा रिजर ही अवजारे देण्यात येतील. |
| २ | ढाळीची बांधबंदिस्ती करणे. | हेक्टर | रु.७५००/- प्रति हे पर्यंत. | सामूहिक उपक्रम |
| ३ | शेततळे खोदणे. (आकार-१००० ते २००० घन मी.), संरक्षित सिंचनाचे क्षेत्र-१ ते २ हेक्टर | संख्या | रु.६०,०००/- प्रति शेततळे पर्यंत खर्चाच्या अतिरिक्त ३३ टक्के रक्कम प्लॅस्टिक अस्तरिकरणासाठी देय | वैयक्तिक शेतकरी/शेतकरी गट/शेतकरी सहकारी संस्था |
| ४ | चेक डॅम/सिमेंट नालाबांध बांधणे (सिंचन क्षेत्र ४-५ हे.) | संख्या | रु.६.०० लाख पर्यंत. | सामूहिक उपक्रम |
| ५ | आस्तित्वात असलेल्या सिमेंट नालाबांधा तील गाळ काढणे व खोलीकरण करणे. (२.० मी. खोली व ५००मी. पर्यंत लांब) | संख्या | रु.५.०० लाख पर्यंत. | सामूहिक उपक्रम |
| ६ | सूक्ष्म सिंचन पध्दतीसाठी अर्थसहाय्य (२ हेक्टर क्षेत्रापर्यत) | हेक्टर | एकूण किंमतीच्या ५० टक्के, रु.३८,०००/- पर्यत (इतर शेतकरी) व एकूण किंमतीच्या ७५ टक्के, रु.५७,०००/- प्रति हे. अल्प व अत्यल्प, मागास भूधारक शेतक-यांकरिता | वैयक्तिक शेतकरी/शेतकरी गट/शेतकरी सहकारी संस्था |
| ७ | तुषार सिंचन पध्दतीकरिता अर्थसहाय्य | संख्या | एकूण किंमतीच्या ५० टक्के, रु.१५,०००/- (इतर शेतकरी) व एकूण किंमतीच्या ७५ टक्के, रु.२२,०००/- अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांकरिता | वैयक्तिक शेतकरी/शेतकरी गट/शेतकरी सहकारी संस्था |
| ८ | पाणी उपसा करण्याकरिता अर्थसहाय्य (डिझेल/विद्युत पंप संच पुरवठा) व डिलीव्हरी पाईप | संख्या | एकूण किंमतीच्या ५० टक्के, रु.१८,०००/- (इतर शेतकरी) व एकूण किंमतीच्या ७५ टक्के, रु.२७,०००/- अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांकरिता | वैयक्तिक शेतकरी/शेतकरी गट/शेतकरी सहकारी संस्था |

http://mahaagri.gov.in

**ब. जलसंधारण विभाग**

| अ.क्र | बाब | परिमाण | अर्थसहाय्याचे प्रमाण | लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| ९ | सिंचन क्षमता पुनर्स्थापना करणे | हेक्टर | रु.७०,०००/- प्रति हे. | सामूहिक उपक्रम |
| १० | नदी नाल्यातील उपलब्ध पाणी उपसा योजनेद्वारे शेततळ्यात भरणे | संख्या | रु.१५,००,०००/- प्रति युनिट | सामूहिक उपक्रम |
| ११ | नविन शेततळयासाठी उपसा सिंचन योजना (सिंचन क्षेत्र २०-३० हे) | संख्या | रु.६५,००,०००/- प्रति युनिट | सामूहिक उपक्रम |
| १२ | आस्तित्वात असलेल्या कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-याच्या पाणीसाठयात वाढ करणे | संख्या | रु.५,००,०००/- प्रति युनिट | सामूहिक उपक्रम |
| १३ | अ) नविन लघुपाटबंधारे योजनेच्या माध्यमातून सिंचन क्षेत्र वाढविणे (२५० हे. सिंचन क्षेत्रापर्यंत) | हेक्टर | रु.३,००,०००/- प्रति हे. | सामूहिक उपक्रम |
| | ब) चालू लघुपाटबंधारे योजनेच्या माध्यमातून सिंचन क्षेत्र वाढविणे (२५० हे. सिंचन क्षेत्रापर्यंत) | हेक्टर | रु.२,५०,०००/- प्रति हे. | सामूहिक उपक्रम |
| १४ | पाणी वापर संस्था/शेतकरी गटाची स्थापना करणे.(प्रती १०००हे प्रकल्पासाठी) | संख्या | रु.२,००,०००/- प्रति प्रकल्प | पाणी वापर संस्था /शेतकरी गट |

बाब क्र. १ ते ८ कृषि विभागामार्फत राबविणेत येतील व बाब क्र.९ ते १४ लघु पाटबंधारेमार्फत राबविणेत येतील.

**कार्यक्रमाची व्याप्ती** –

सदरचा कार्यक्रम विदर्भ विभागातील बुलढाणा,अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर व चंद्रपूर या ८ जिल्हयातील तालुक्यामध्ये राबविण्यात येईल. हा कार्यक्रम समूह पध्दत आधारीत राबविण्यात यावा. यामध्ये पिकाखालील सलग १००० हेक्टर क्षेत्र धरुन कार्यक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणी करावी. **कार्यक्रमाची अंमलबजावणी करणेसाठी निवडलेल्या प्रत्येक तालुक्यातुन एका समुहाची (Cluster) निवड खाली नमुद केलेल्या निकषाचे आधारे प्राधान्यक्रमानुसार करावी.**

**कार्यक्रम अंमलबजावणीसाठी समूहाची निवड (Cluster)**

कार्यक्रमाची अंमलबजावणी ही प्रकल्प आधारीत (Project Mode) करावयाची आहे. त्यामुळे पीकाखालील सलग १००० हेक्टर क्षेत्र हे प्रकल्पाचे क्षेत्र समजण्यात यावे. **ज्या क्षेत्रात केंद्र पुरस्कृत एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम आणि नाबार्ड- पायाभुत सुविधा विकास निधी सहाय्यीत पाणलोट विकास कार्यक्रम चालु आहे ते क्षेत्र या कार्यक्रमासाठी निवड करु नये.**

**कार्यक्रमांतर्गत क्लस्टरची निवड करण्यासाठी खालील निकष विचारात घेण्यात यावेत.**

१. ज्या क्षेत्रात कापूस पीकासाठी व इतर पीकासाठी सिंचनाची सोय उपलब्ध नाही व संपुर्ण क्षेत्र कोरडवाहू आहे.
२. ज्या क्षेत्रात पूर्वी पाणलोट विकासाच्या विविध योजनांतून सिमेंट बंधारेची कामे झाली आहेत व त्यामध्ये गाळ साठून पाणी साठवण क्षमता कमी झालेली आहे. तसेच उपलब्ध क्षेत्रामध्ये नविन चेकडॅमची कामे करण्यास वाव आहे.

http://mahaagri.gov.in

३. ज्या गावात कापूस पिकाखालील जास्त क्षेत्र आहे.
४. कापूस पीकाची उत्पादकता कमी असलेली गावे.
५. समुहाची निवड शक्यतो लघुपाटबंधारे योजना ज्या भागात कार्यान्वयीत करणे शक्य आहे त्या ठिकाणी करणेत यावी.
६. समुहाची निवड संबंधित विभागीय कृषि सह संचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी यांनी संयुक्तरित्या करावी.

**कार्यक्रमाचे लाभार्थी -**

सदर कार्यक्रम राबविताना अनु.जाती/अनु.जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी, स्वयंसहाय्यता गटातील शेतकरी, अल्प व अत्यल्प भूधारक सहकारी संस्था, महिला शेतकरी यांना प्राधान्याने लाभ देण्यात यावा.

**कार्यक्रमाचे नियोजन व मान्यता** –

विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी राष्ट्रीय कृषि विकास योजनेची उपयोजना म्हणून करण्यात येईल. त्यामुळे या कार्यक्रमाचे नियोजन व कार्यक्रमास मान्यता देणेची पध्दत राष्ट्रीय कृषि विकास योजनप्रमाणेच राहील. कार्यक्रम अंतर्गत मंजूर बाबींचा समावेश जिल्हा कृषि आराखडा (C-DAP) व राज्य कृषि आराखडा (SAP) मध्ये असणे अनिवार्य राहील. कार्यक्रमाचे नियोजन, लाभार्थी निवड व कार्यक्रमांतर्गत राबविण्याच्या बाबी निश्चित करताना पंचायत राज संस्था, व ग्रामपंचायत व संलग्न शासकीय विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, संबधित जिल्हयाचे आत्मा संस्था व पाणलोट समिती इत्यादिचा सहभाग घ्यावा. कार्यक्रम राबविण्यासाठी निश्चित केलेल्या बाबींचा कृति आराखडा तयार करुन तो संबधित विभागास मान्यतेसाठी पाठविण्यात यावा. आराखडा तयार करण्याचे प्रपत्र **"परिशिष्ट अ"** मध्ये देण्यात आले आहे. प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी कार्यक्रमांतर्गत असलेल्या तरतूदीचा वापर करावा. समुहातंर्गत हाती घ्यावयाच्या कामाच्या आराखडयासोबत समुहाचा नकाशा देणे आवश्यक आहे. सदर नकाशामध्ये अस्तित्वात असलेले शेततळे, ढाळीचे बांधबंदिस्ती, सिमेंट नाला बांध व नव्याने हाती घ्यावयाची कामे सर्वे नंबर निहाय दाखविणे आवश्यक राहील. या कामासाठी विभाग स्तरावर स्थापन केलेल्या सुदुर संवेदन कक्षाची मदत घेणेत यावी. प्राप्त झालेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाची छाननी विभागीय कृषि सहसंचालक स्तरावर करण्यात यावी. सविस्तर प्रकल्प अहवालाची छाननी पूर्ण झालेनंतर जिल्हानिहाय सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता घेण्यासाठी राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीसमोर कृषि आयुक्तालयामार्फत शिफारशीसह सादर करण्यात यावेत.

**कार्यक्रमाची अंमलबजावणी -**

कार्यक्रमाची अंमलबजावणी परिणमकारक करणेसाठी आयुक्तालयस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर व उपविभागस्तरावर स्वतंत्र कक्षाची स्थापना करणेत येत आहे. त्यासाठी राज्यस्तरावर या संपुर्ण कार्यक्रमाची अंमलबजावणी, संनियंत्रण आणि आढावा घेण्यासाठी संचालक (मृ.सं.) यांची नोडल अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात येत आहे. विभागस्तरावर विभागीय अधिक्षक कृषि अधिकारी आणि जिल्हास्तरावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे नोडल अधिकारी असतील. त्यानुसार त्या त्या पातळीवर संबंधितानी स्वतंत्र कक्षाची नेमणुक करावी. सदर कक्षामार्फत या योजनेचे संनियंत्रण करण्यात यावे. तसेच कार्यक्रमातर्गत झालेल्या प्रगतिचा दरमहा आढावा घेण्यात यावा. कार्यक्रमाचे सनियंत्रण, प्रशासकीय खर्च व इतर आकस्मिक खर्चासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे १ टक्के पर्यत निधी देय राहील.

http://mahaagri.gov.in

जिल्हास्तरावर सदरचा कार्यक्रम संबधित जिल्हयाचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (कृषि विभागाच्या बाबीसाठी) व कार्यकारी अभियंता, लपा (लघूपाटबंधारे संबधित बाबीसाठी) यांचे मार्फत अंमलबजावणी करण्यात येईल. कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रकल्प आधारीत करण्यात यावी.

**कृषि विभागामार्फत राबविण्यात येणारा कार्यक्रमासाठी उपविभागीय कृषि अधिकारी हे प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणुन काम करतील.**

**कार्यक्रमातंर्गत समुह क्षेत्राची (Cluster) निवड करुन मान्यता घेणेसाठी करावयाची कार्यवाही**

| अ.क्र | कामाचे नाव | कार्यवाही करणारे अधिकारी |
|---|---|---|
| १. | समुह क्षेत्राची (Cluster) निवड निकषानुसार करणे. | उपविभागीय कृषि अधिकारी |
| २. | समुहाचा (Cluster) विहीत प्रपत्रातील कृति आराखडा तयार करणे. | संबंधित मंडळ कृषि अधिकारी |
| ३. | कृति आराखडयात नमुद केलेल्या बाबींची क्षेत्र परिस्थितीनुसार खात्री करणे. | संबंधित तालुका कृषि अधिकारी |
| ४. | समुह क्षेत्राचा (Cluster) आराखडा मंजुरीसाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी आणि विभागीय कृषि सह संचालक यांचेमार्फत कृषि आयुक्तालयास सादर करुन त्यास मान्यता घेणे. | संबंधित उपविभागीय कृषि अधिकारी |
| ५. | समुह क्षेत्रातील नियोजित (Cluster) भौतिक व आर्थिक आराखडयास राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मान्यता घेणे. | मा.आयुक्त कृषि यांचे मान्यतेने संचालक (मृ.सं.) |

**घटकनिहाय कामे करणेसाठी अधिकारी व कर्मचारी यांच्या जबाबदा-या :-**

**१. मूलस्थानी मृद व जल संधारणाचा अवलंब करणे अंतर्गत रुंद वरंबा व सरी आणि मृत सरी उघडणे याकरिता प्रोत्साहन :-**

जलसंधारणाच्या पध्दती फार उपयुक्त असल्याने विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमात अंतर्भूत करण्यात आल्या आहेत. विदर्भ विभागातील कापूस, तूर, सोयाबीन इत्यादी पिकांसाठी या पध्दतीचा अवलंब करण्यासाठी शेतक-यांना प्रोत्साहन देण्यासाठी व पिकांची लागवड रुंद वरंबा व सरी, सरी व वरंबा पध्दतीने करणेसाठी शेतक-यांना रिजर किंवा बीबीएफ प्लॅन्टर उपलब्ध करुन देणेत यावा. निवडलेल्या समुह क्षेत्रात २५ ते ३० शेतक-यांचा गट स्थापन करुन त्या गटास ट्रॅक्टर चलित बीबीएफ प्लॅन्टर देण्यात यावा. यासाठी गटातील शेतक-यास दर हेक्टरी देय असलेल्या रु.१०००/- चे अनुदानाचे एकत्रीकरण गट पातळीवर करण्यात यावे. गटाबाहेरील वैयक्तिक शेतक-यास स्वतः बैलचलित बीबीएफ औजार घ्यावयाचे असल्यास त्यास स्वतंत्ररित्या अनुदान देण्यात यावे. तथापि या दोन्ही बाबत औजाराची खरेदी झाल्यानंतर व ते प्रत्यक्ष शेतकरी गट/शेतकरी यांनी ताब्यात घेतल्यानंतर अनुदान देण्यात यावे. वरील दोन्ही प्रकारची औजारे खरेदी करण्यासाठी जिल्ह्यास्तरीय आत्मा समितीची मान्यता घेणे बंधनकारक असेल. शेतक-यांनी औजारे खरेदी करताना संबंधित डीलरने त्यावर शेतक-याचे नाव, गाव व योजना इ. चा तपशील एंबॉसींग करणे तपासणीसाठी अनिवार्य राहील. सदर औजाराची खरेदी शेतकरी गट/शेतकरी यांनी केल्यावर त्याची तपासणी कृषि पर्यवेक्षक यांनी करावी. कृषि पर्यवेक्षक यांचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यावर संबंधितांस अनुदान अदा करावे. कोणत्याही परिस्थितीत अनुदान डीलरला न देता थेट शेतकरी गट/शेतक-यास देण्यात यावे. जर संबंधित शेतक-यास ही औजारे इतर योजनेतून पुर्वी पुरविली गेली असतील तर त्यांना लाभ देऊ नये. मात्र असे शेतकरी गट/शेतकरी हे योजनेंतर्गत इतर बाबींसाठी पात्र राहतील.

http://mahaagri.gov.in

| अ.क्र. | बाब | कार्यवाही करणारे अधिकारी |
|---|---|---|
| १ | शेतकरी/शेतक-यांच्या गटाची निवड व अर्ज प्राप्त करणे. | कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक |
| २ | रिजर किंवा बीबीएफ प्लन्टर खरेदी करणे. | आत्मा संस्थेच्या मान्यतेने लाभार्थी शेतकरी गट/शेतकरी |
| ३ | प्राप्त अवजारांचे शेतक-यास वाटप व साठापुस्तक ठेवणे. | मंडळ कृषि अधिकारी आणि तालुका कृषि अधिकारी |

## २. ढाळीची बांधबंदिस्ती :-

| अ.क्र. | बाब | कार्यवाही करणारे अधिकारी |
|---|---|---|
| १ | सर्वेक्षण व अंदाजपत्रक तयार करणे | कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक |
| २ | अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देणे | उपविभागीय कृषि अधिकारी/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (विहीत आर्थिक मर्यादेनुसार) |
| ३ | मापन पुस्तिकात मापे नोंदविणे | कृषि सहाय्यक |
| ४ | रक्कम चेकद्वारे अदा करणे | तालुका कृषि अधिकारी |
| ५ | ढाळीची बांधबंदिस्ती करणेच्या तांत्रिक मार्गदर्शक सुचना आयुक्तालयाचे पत्र क्र. मृदसं/मृद-६/ ता.व आ.मा/ २२६७ दि.१५/१०/२००७ प्रमाणे लागु रहातील. | |

## ३. शेततळे :-

| अ.क्र. | बाब | कार्यवाही करणारे अधिकारी |
|---|---|---|
| १ | लाभार्थी निवड करणे, लाभार्थीचा अर्ज शिफारशीसह तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करणे | कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक |
| २ | शेततळ्याची जागा निश्चित करणे | कृषि पर्यवेक्षक व मंडळ कृषि अधिकारी |
| ३ | शेततळ्यासाठी लाभार्थीस लाभासाठी पात्र असलेबाबत शिफारस करणे | मंडळ कृषि अधिकारी |
| ४ | शेततळे यादी तयार करणे व जिअकृअ यांचेकडे मंजुरीसाठी सादर करणे | तालुका कृषि अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी |
| ५ | मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा समितीची शेततळे यादीस मान्यता घेणे | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी |
| ६ | निवड झालेल्या लाभार्थीस कार्यारंभ आदेश देणे | तालुका कृषि अधिकारी |
| ७ | कामाची आखणी करणे | कृषि सहाय्यक/ कृषि पर्यवेक्षक |
| ८ | शेततळ्याची कामे मशिन लावुन करावीत. | लाभार्थी |
| ९ | मापन पुस्तिकात मापे नोंदविणे | कृषि सहाय्यक |
| १० | शेततळ्याची अनुदान रक्कम धनाकर्षाद्वारे अदा करणे | तालुका कृषि अधिकारी |
| ११ | शेततळ्यांच्या तांत्रिक मार्गदर्शक सुचना आयुक्तालयाचे पत्र क्र. मृदसं/राकृवियो/शेततळे/मासु./ मृद-४/७९२/१० दि. ८/२/२०१० प्रमाणे लागु रहातील. | |

http://mahaagri.gov.in

**४. सिमेंट नालाबांध बांधणे :-**

| अ.क्र. | बाब | कार्यवाही करणारे अधिकारी |
|---|---|---|
| १ | सिमेंट नालाबांधाची जागा निश्चित करणे | तालुका कृषि अधिकारी |
| २ | सर्वेक्षण व सविस्तर अंदाजपत्रक तयार करणे | कृषि सहाय्यक |
| ३ | अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देणे | उपविभागीय कृषि अधिकारी/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (विहीत आर्थिक मर्यादेनुसार) |
| ४ | बांधाची आखणी करणे | कृषि सहाय्यक/ कृषि पर्यवेक्षक |
| ५ | सिमेंट नालाबांधाची पाया तपासणी करणे | कृषि पर्यवेक्षक/मंडळ कृषि अधिकारी |
| ६ | नालाबांधाची कामासाठी आवश्यक साहित्य खरेदी करणे व साहित्याची रक्कम चेकद्वारे अदा करणे | तालुका कृषि अधिकारी |
| ७ | मापन पुस्तिकात मापे नोंदविणे | कृषि सहाय्यक |
| ८ | कामाची मजुरी चेकद्वारे अदा करणे | मंडळ कृषि अधिकारी |
| ९ | सिमेंट नालाबांध बांधणेच्या तांत्रिक मार्गदर्शक सुचना आयुक्तालयाचे परिपत्रक क्र. मृदसं-७७८८/सिमेंट नाला बांध/कृषि-५४ दि.२५/९/८९ प्रमाणे लागु रहातील. | |

**५. आस्तित्वात असलेल्या सिमेंट नालाबांधातील गाळ काढणे व खोलीकरण करणे :-**

| अ.क्र. | बाब | कार्यवाही करणारे अधिकारी |
|---|---|---|
| १ | सिमेंट नालाबांधाची गाळ काढण्याच्या कामासाठी निवड करणे | मंडळ कृषि अधिकारी |
| २ | सर्वेक्षण व अंदाजपत्रक तयार करणे | कृषि सहाय्यक व कृषि पर्यवेक्षक |
| ३ | अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देणे | उपविभागीय कृषि अधिकारी/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (विहीत आर्थिक मर्यादेनुसार) |
| ४ | नालाबांधातील गाळ काढणे व खोलीकरण करणेसाठी मशीन धारक निश्चित करणे. | उपविभागीय कृषि अधिकारी |
| ५ | मापन पुस्तिकात मापे नोंदविणे | कृषि सहाय्यक |
| ६ | कामाची रक्कम धनाकर्षाद्वारे अदा करणे | तालुका कृषि अधिकारी |
| ७ | सिमेंट नालाबांधातील गाळ काढणे व खोलीकरण करणेच्या तांत्रिक मार्गदर्शक सुचना आयुक्तालयाचे पत्र क्र. मृदसं/मृद-६/राकृवियो- सिनाबं गाळ/अनुदान/ २७८२ दि.२२/११/२०११ प्रमाणे लागु रहातील. | |

**६. सूक्ष्म सिंचन पध्दतीसाठी अर्थसहाय्य :-**

| अ.क्र. | बाब | कार्यवाही करणारे अधिकारी |
|---|---|---|
| १ | पुर्व संमती पत्र देणे. | तालुका कृषि अधिकारी |
| २ | संच उभारणीसाठी पाणी व अश्र्वशक्ती उपलब्धतता अहवाल देणे. | मंडळ कृषि अधिकारी |
| ३ | संच बसलेनंतर १०० टक्के मोका तपासणी करणे. | मंडळ कृषि अधिकारी |

http://mahaagri.gov.in

| | | |
|---|---|---|
| ४ | अनुदान अदायगीसाठी शिफारस करणे | तालुका कृषि अधिकारी |
| ५ | अनुदान अदायगी प्रस्तावास मान्यता देणे | उपविभागीय कृषि अधिकारी |
| ६ | शेतक-यास अनुदान अदायगी करणे. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी |

**७. पाणी उपसा उपकरणांचा पुरवठा करणे**
**(पेट्रो-केरोसीन/डिझेल/विद्युत पंप संच व डिलीव्हरी पाईप)**

| अ.क्र | बाब | कार्यवाही करणारे अधिकारी |
|---|---|---|
| १ | शेतकरी अर्ज व उपकरण मागणी गोळा करणे. | कृषि सहाय्यक/ कृषि पर्यवेक्षक |
| २ | स्थानिक पातळीवर प्रसिध्दी देणे | तालुका कृषि अधिकारी |
| ३ | पाणी उपसा साधनांची (पेट्रो-केरोसिन/डिझेल/विद्युत पंप संच व डिलीव्हरी पाईप) खरेदी करणे. | आत्मा समिती |
| ४ | प्राप्त साधनांचे शेतक-यास वाटप व साठापुस्तक ठेवणे. | मंडळ कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी |

**निधीचे वितरण** –

कार्यक्रमातंर्गत मंजूर बाबींची अंमलबजावणी करण्याकरिता निधीचे वितरण कृषि आयुक्तालयस्तरावरुन संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे बॅक खात्यात जमा करण्यात येईल. त्यानंतर सदरचा निधी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी संबधित प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेला (उप विभागीय कृषि अधिकारी) वितरीत करण्यात यावा. लघूपाटबंधारे विभागाशी संबधित बाबी राबविण्यासाठी आवश्यक निधी संबधित यंत्रणेमार्फत वितरीत करण्यात येईल.

**कामाची तपासणी** –

विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रम हा विदर्भ विभागातील कोरडवाहू कापूस व इतर पिके पीकविणा-या शेतक-यांच्या उन्नतीसाठी केंद्र शासनाने मंजूर केलेला आहे. सदरचा कार्यक्रम महत्वाकांक्षी कार्यक्रम म्हणून हाती घेण्यात आलेला आहे,त्यामुळे कार्यक्रमांतर्गत हाती घेण्यात आलेली कामे तांत्रीकदृष्टया निर्दोष असणे आवश्यक आहे. सदरची कामे दर्जेदार व कामाची गुणवत्ता उत्कृष्ट राहील या हेतूने कामे चालू असताना व कामे पूर्ण झालेनंतर कामांची तपासणी करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने कार्यक्रमांतर्गत हाती घेतलेल्या प्रत्येक घटकाची/कामांची तपासणी खालील प्रमाणे करण्यात यावी.

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | तपासणी करावयाच्या कामांची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | कृषि पर्यवेक्षक | १०० | **१.**कामाची तपासणी करताना तांत्रीक तपासणी टिपणी काढणे आवश्यक आहे. **२.**कृ.प.वगळता इतर सर्व अधिका-यांनी तपासणी करताना त्यांच्यापेक्षा कनिष्ठ अधिका-यांने तपासणी केलेल्या कामाची किमान ५० टक्के तपासणी करावी. |
| २ | मंडल कृषि अधिकारी | २५ | |
| ३ | तालुका कृषि अधिकारी | १० | |
| ४ | उपविभागीय कृषि अधिकारी | ५ | |
| ५ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | २ | |
| ६ | विभागीय कृषि सह संचालक | १ | |

http://mahaagri.gov.in

**योजनेचा आढावा व अहवाल सादरीकरण** –

ग्रामपातळीवर योजनेच्या अंमलबजवणीमध्ये ग्रामपंचयतीस सहभागी करुन घेणेत यावे. लाभार्थींची निवड करताना ग्रामसभेत करणेत यावी. योजनेंअंतर्गत झालेल्या कामाची माहिती ग्रामसभेस देण्यात यावी.

जिल्हास्तरावर कामाचा आढावा कृषि विभागाच्या बाबीसाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तर लघुपाटबंधारे विभागाच्या बाबीसाठी कार्यकारी अभियंता (स्थानिक स्तर) ल.पा. यांनी प्रत्येक महिन्याला घेणेत यावा. यामध्ये संलग्न खात्याचे व जिल्हा परिषद प्रतिनिधीचा देखील समावेश असावा.

विभागस्तरावर कार्यक्रमाच्या प्रगतीचा तिमाही आढावा विभागीय आयुक्त, अमरावती व नागपुर यांनी संबंधीत विभागीय कृषि सह संचालक व अधिक्षक अभियंता (स्थानिक स्तर) ल.पा. यांचे समवेत घेणेत यावा.

राज्यस्तरावर कार्यक्रमाच्या प्रगतीचा आढावा मा. प्रधान सचिव (कृषी)/कृषि आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली घेणेत येईल. यामध्ये मुख्य अभियंता (स्थानिक स्तर) ल.पा. यांचा समावेश राहील.

योजनेअंतर्गत झालेल्या कामाचा मासिक प्रगति अहवाल  कृषि आयुक्तालयास दरमहा १० तारखेपर्यत **“परिशिष्ट–ब”** मध्ये दिलेल्या विहीत नमुन्यात सादर करण्यात यावा.

सदर कार्यक्रमाचा आढावा राष्ट्रीय स्तरावरावर देखिल घेण्यात येईल. राष्ट्रीय स्तरावर या कार्यक्रमाचा व्दिवार्षिक आढावा घेण्यात येईल. यामध्ये क्षेत्रीय भेट आणि ठराविक कालावधीनंतर आढावा याचा समावेश असेल. कार्यक्रमाची परिणामकारकता वाढविणेसाठी भारतीय कृषि अनुसंधान परिषद व तत्सम संस्था यांचा सहभाग सनियंत्रणामध्ये घेण्यात येईल.

**कार्यक्रमाची फलनिष्पत्ती** –

विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमाची अमंलबजावणी पूर्ण झाल्यानंतर कोरडवाहू कापूस पिकासाठी संरक्षित सिंचनाचे क्षेत्रात वाढ होणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे शेतक-यांना पाण्याची उपलब्धता झाल्यामुळे दुसरे पीक घेणे शक्य होणे अपेक्षित आहे. त्याशिवाय कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतून खालीलप्रमाणे फलनिष्फत्ती मिळणे आवश्यक राहील.

१. सिंचन क्षेत्रात झालेली वाढ
२. भुगर्भातील पाणी पातळीत वाढ होणे
३. कापूस पिकाच्या उत्पादकतेत  झालेली वाढ.
४. शेतक-यांच्या उत्पन्नात झालेली वाढ
५. इतर अप्रत्यक्ष झालेले फायदे

**कार्यक्रमाचे मूल्यमापन** –

कार्यक्रमांतर्गत हाती घेतलेली कामे पुर्ण झाल्यानंतर कार्यक्रमाचे त्रयस्थ संस्थेकडुन मुल्यमापन करण्यात येईल.

स्वाक्षरीत/-

**आयुक्त कृषि**

**महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.**

http://mahaagri.gov.in

## परिशिष्ट अ

## गावातील क्लष्टरचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्रपत्र

गावाचे नांव- -------------- तालुका- ------------- जिल्हा -----------------

१. गावाचे भौगालिक क्षेत्र (हें.) -

२. क्लष्टरमधील समाविष्ट पाणलोटाची नांवे –

३. गावाचे सरासरी पर्जन्यमान (मी.मी.) –

४. एकूण शेतकरी कुटुंबाची संख्या -

अ) अल्प भूधारक शेतकरी –

ब) अत्यल्प भूधारक शेतकरी –

क) अनुसूचित जाती

ड) जमाती शेतकरी –

ई) इतर शेतकरी –

५. गावातील सिंचन सुविधा –

अ) विहीर बागायत क्षेत्र - हे.

ब) शेततळे, सिंमेट बंधारे याद्वारे संरक्षित सिंचनाखालील क्षेत्र- --- हे.

क) उपसा सिंचन व कॅनाल बागायत क्षेत्र - हे.

६. विहीरींची संख्या - बोअरवेलची संख्या -

७. विहीरीतील पाण्याची पातळी (मे महिन्यातील) - --- मीटर

८. मुख्य पिकाखालील क्षेत्र (हे.) व उत्पादकता (कि.ग्रॅम प्रती हे.) सध्यस्थिती –

| अ.क्र. | पिकाचे नांव | क्षेत्र | उत्पादकता |
|---|---|---|---|
| **अ)** | **खरीप हंगाम** | | |
| १. | कापुस | | |
| २. | भात | | |
| ३. | तुर | | |
| ४. | सोयाबीन | | |
| ५. | इतर (--------) | | |
| **ब)** | **रब्बी हंगाम** | | |
| १. | गहु | | |
| २. | हरभरा | | |
| ३. | इतर (--------) | | |

९. यापूर्वी गावातील क्लष्टरमध्ये अस्तित्वात असलेली कामे –

**अ. सिंमेट नाला बांध ( चेक डॅम)**

१. संख्या –

२. सिंचन क्षेत्र - हे.

http://mahaagri.gov.in

**ब. शेततळे**

१. संख्या –

२. संरक्षित सिंचन क्षेत्र - हे.

**क. ढाळीची बांध बंधिस्ती - हे.**

**ड. कापुस पिकाची रुंद सरी व वरंबा पध्दतीने लागवड - हे.**

**इ. सुक्ष्म सिंचनाखालील क्षेत्र**

१. ठिबक सिंचन – हे.

(त्यापैकी कापुस पिकाखालील क्षेत्र ----- हे )

२. तुषार सिंचन – हे.

**१०. कार्यक्रमातंर्गत प्रस्तावित बाबी** –

**अ. मूलस्थानी मृद व जल संधारणाचा अवलंब करणे अंतर्गत रुंद वरंबा व सरी आणि मृत सरी उघडणे याकरिता प्रोत्साहन**

| अ. क्र. | शेतकरी प्रवर्ग | रुंद वरंबा व सरी वर लागवड करणे | शेतकरी संख्या | रुंद वरंबा व सरी काढणेसाठी आवश्यक अवजारे | | आवश्यक शेतकरी प्रशिक्षण संख्या | आवश्यक रक्कम रु. लाखात | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ट्रॅक्टर चलीत | बैल चलीत | | | |
| १ | अल्प भुधारक | | | | | | | |
| २ | अत्यल्प भुधारक | | | | | | | |
| ३ | अनु. जाती | | | | | | | |
| ४ | अनु. जमाती | | | | | | | |
| ५ | इतर | | | | | | | |
| | एकुण | | | | | | | |
| ५ | महिला शेतकरी | | | | | | | |

**ब. ढाळीचे बांध बंदिस्ती**

| अ. क्र. | शेतकरी प्रवर्ग | क्लस्टर मध्ये एकुण करावयाचे काम हे. | विदर्भ सिंचन विकास कार्यक्रमाअंतर्गत प्रस्तावित ढाळीचे बांधबांदिस्ती | | | | इतर योजनांतर्गत प्रस्तावित क्षेत्र हे. | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रस्तावित क्षेत्र हे. | शेतकरी संख्या | मापदंड रु. प्रती हे. | आवश्यक निधी रु.लाख | म.गां.रा. ग्रा.रोहयो | एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम | |
| १ | अल्प भुधारक | | | | | | | | |
| २ | अत्यल्प भुधारक | | | | | | | | |
| ३ | अनु. जाती | | | | | | | | |
| ४ | अनु. जमाती | | | | | | | | |
| ५ | इतर | | | | | | | | |
| | एकुण | | | | | | | | |
| ६ | महिला शेतकरी | | | | | | | | |

http://mahaagri.gov.in

**क. प्रस्तावित शेततळयांची माहिती**

| अ. क्र. | शेततळे आकार मी. मध्ये | शेततळे संख्या | लाभ द्यावयाचे शेतकरी | | | | | | | आवश्यक निधी रु. लाख | साठवण क्षमता टिसीएम | निर्मित संरक्षित सिंचन हे. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अल्प भुधारक | अत्यल्प भुधारक | अनु जाती | अनु जमाती | इतर | एकुण | महिला शेतकरी | | | |
| १ | २० x १५ x ३ | | | | | | | | | | | |
| २ | २० x २० x ३ | | | | | | | | | | | |
| ३ | २५ x २० x ३ | | | | | | | | | | | |
| ४ | २५x २५ x ३ | | | | | | | | | | | |
| ५ | ३० x २५ x ३ | | | | | | | | | | | |
| ६ | ३० x ३०x ३ | | | | | | | | | | | |
| | एकुण | | | | | | | | | | | |

**ड) प्रस्तावित सिंमेट नालाबांधाची माहिती**

| अ.क्र. | नाल्याचे नांव (स्थानिक नांव) | प्रस्तावित नाला बाधाची संख्या | सर्व्हे नंबर | आवश्यक निधी रु. लाख. | नालाबांधामुळे तयार होणारा पाणीसाठा (टीसीएम) | प्रस्तावित बांधामुळे होणारे हंगामी बागायत क्षेत्र हे. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |
| | एकूण | | | | | |

**इ) सिंमेट नालाबांधातील गाळ काढून खोलीकरण करणेची माहिती**

| अ. क्र. | नाल्याचे नांव (स्थानिक नांव) | नाला बांधाचा नंबर | बांध बांधलेचे वर्ष | सर्व्हे नंबर | सध्यस्थिती तील बांधाची पाणी साठवण क्षमता (टीसीएम) | ग़ाळ काढणे व खोलीकरण करणेची लांबी व खोली मी. | आवश्यक निधी रु. लाख | काम केल्यामुळे पाणी साठयात होणारी वाढ (टीसीएम) | कामा मुळे वाढणारे सिंचन क्षेत्र हे. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | |

http://mahaagri.gov.in

**फ. सूक्ष्म सिंचन पध्दतीसाठी अर्थसहाय्य (ठिबक व तुषार सिंचन)**

**रु. लाखात**

| अ. क्र. | अंतर मी. मध्ये | क्षेत्र हे. | लाभार्थी संख्या | | | आवश्यक निधी रु. लाख | लाभार्थी वर्गवारी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अल्प व अत्यल्प भुधारक | इतर | एकुण | | इतर | अनु. जाती | अनु जमाती | अपंग | महिला शेतकरी |
| | ठिबक सिंचन | | | | | | | | | | |
| १ | १.५ x १.५ | | | | | | | | | | |
| २ | २.५ x ०.६० | | | | | | | | | | |
| ३ | १.८ x ०.६० | | | | | | | | | | |
| ४ | १.२ x ०.६० | | | | | | | | | | |
| | एकुण | | | | | | | | | | |
| | तुषार सिंचन | | | | | | | | | | |
| १ | | | | | | | | | | | |
| एकुण ठिबक व तुषार सिंचन | | | | | | | | | | | |

**ग. पाणी उपसा करण्याकरिता अर्थसहाय्य (डिझेल/विद्युत पंप संच)**

**रु. लाख**

| अ.क्र. | लाभार्थी प्रकार | पंप संचाचा प्रकार (डिलीव्हरी पाईपसह) | | | एकुण आवश्यक निधी |
|---|---|---|---|---|---|
| | | विद्युत पंप संच | डिझेल इंजिन | एकुण | |
| १ | अल्प | | | | |
| २ | अत्यल्प | | | | |
| ३ | अनु. जाती | | | | |
| ४ | अनु जमाती | | | | |
| ५ | इतर | | | | |
| | एकुण | | | | |
| | महिला शेतकरी | | | | |

**११. कार्यक्रमासाठी आवश्यक निधीचा तपशील**

**(रु. लाखात)**

| अ.क्र. | बाब | परिमाण | भौतिक | आर्थिक |
|---|---|---|---|---|
| अ. | मृद व जल संधारण | | | |
| १. | मूलस्थानी मृद व जल संधारणाचा अवलंब करणे अंतर्गत रुंद वरंबा व सरी आणि मृत सरी उघडणे याकरिता प्रोत्साहन | हे. | | |
| २. | ढाळीची बांधबंदिस्ती | हे. | | |

http://mahaagri.gov.in

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | शेततळे (आकार-०.८७ ते २.०० हजार घन मी.), संरक्षित सिंचनाचे क्षेत्र-१ ते २ हेक्टर | संख्या | | |
| ४. | सिमेंट नालाबांध बांधणे (सिंचन क्षेत्र ४-५ हे.) | संख्या | | |
| ५. | आस्तित्वात असलेल्या सिमेंट नालाबांधातील गाळ काढणे व खोलीकरण करणे. | संख्या | | |
| एकुण मृद व जल संधारण | | | | |
| ब. | सूक्ष्म सिंचन पध्दतीसाठी अर्थसहाय्य | | | |
| १ | ठिबक | हे. | | |
| २ | तुषार सिंचन | संख्या | | |
| | एकुण सूक्ष्म सिंचन | | | |
| क. | पाणी उपसा उपकरणासाठी अर्थसहाय्य (डिझेल/विद्युत पंप संच) | संख्या | | |
| एकुण कृषि | | | | |

दिनांक -

स्वाक्षरी

(नाव - )

उप विभागीय कृषि अधिकारी -----

तथा

प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा

जिल्हा --------------

http://mahaagri.gov.in

**परिशिष्ट- ब**

**मासिक प्रगती अहवाल**

महिना : वर्ष: २०१२-१३

जिल्हा : (आर्थिक रु. लाखात)

| अ.क्र. | बाब | परिमाण | उदिष्ट | | महिन्यातील साध्य | | प्रागतीक साध्य | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| अ. | मृद व जल संधारण | | | | | | | |
| १. | मूलस्थानी मृद व जल संधारणाचा अवलंब करणे अंतर्गत रुंद वरंबा व सरी आणि मृत सरी उघडणे याकरिता प्रोत्साहन | हे. | | | | | | |
| २. | ढाळीची बांधबंदिस्ती | हे. | | | | | | |
| ३. | शेततळे (आकार-०.८७ ते २.०० हजार घन मी.), संरक्षित सिंचनाचे क्षेत्र-१ ते २ हेक्टर | संख्या | | | | | | |
| ४. | सिमेंट नालाबांध बांधणे (सिंचन क्षेत्र ४-५ हे.) | संख्या | | | | | | |
| ५. | आस्तित्वात असलेल्या सिमेंट नालाबांधातील गाळ काढणे व खोलीकरण करणे. | संख्या | | | | | | |
| एकुण मृद व जल संधारण | | | | | | | | |
| ब. | सूक्ष्म सिंचन पध्दतीसाठी अर्थसहाय्य | | | | | | | |
| १ | ठिबक | हे. | | | | | | |
| २ | तुषार सिंचन | संख्या | | | | | | |
| | एकुण सूक्ष्म सिंचन | | | | | | | |
| क. | पाणी उपसा उपकरणांचा पुरवठा करणे (पेट्रो-केरोसीन /डिझेल/विद्युत पंप संच व डिलीव्हरी पाईप) | संख्या | | | | | | |
| एकुण कृषि | | | | | | | | |

http://mahaagri.gov.in